INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.828 (SJIF 2022)

# औरंगजेब बादशहा आणि जिजिया कर

# (Emperor Aurangzeb and Jijia Kar)

**प्रा. डॉ. आर. ए. चव्हाण**

इतिहास विभाग
महिला महाविद्यालय, गेवराई, जि. बीड
E-mail: rchavan1972@gmail.com

**DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/05.2022-77349541/IRJHIS2205006**

**प्रस्तावना :**

भारताच्या इतिहासामध्ये मोगल बादशहा बाबराने इ.स. १५२६ मध्ये भारतावर आक्रमण केले. पानिपतचे पहिले युध्द इब्राहीमखान लोदी आणि बाबर यांच्यामध्ये झाले. यात बाबराचा विजय झाला. त्याने मोगल सत्तेची स्थापना केली. २६ डिसेंबर १५३० मध्ये बाबराचा मृत्यू झाला. त्यानंतर हुमायुन (इ.स. १५३० ते १५५६) अकबर (इ.स. १५५६ ते १६०५) जहाँगिर (इ.स. १६०५ ते १६२७) शहाजहान (इ.स. १६२८ ते १६६६) इ.स. १६५७ मध्ये आजारी पडले. त्यांच्या उत्तराधिकारीसाठी दारा, शुजा, औरंगजेब आणि मुरांद यांच्यात संघर्ष झाला यामध्ये औरंगजेबाचा विजय झाला. त्याने शहाजहानला आग्रा किल्ल्यात कैद केले. २१ जुलै १६५८ मध्ये औरंगजेब बादशहा सिंहासनावर बसले. इ. स. १६५८ ते १७०७ पर्यंत अनेक मोहीमा हाती घेतल्या त्यात विजयही मिळाला. आपल्या कारकिर्दीमधील १६८२ ते १७०७ दक्षिण मोहीम शेवटची ठरली. २० फेब्रुवारी १७०७ भिंगार (अहमदनगर) येथे त्यांचा मृत्यू झाला. खुलताबाद येथे दफनविधी केला. औरंगजेबाचा मृत्युही मध्ययुगीन भारताच्या इतिहासाला कलाटणी देणारी घटना ठरली. असे म्हणावे लागते. मराठ्यांच्या इतिहासाचा विचार करतांनाही औरंजेबाचा मृत्यू ही घटना नव्या कालखंडाची नांदी ठरली असे दिसून येते.

**जिजियाकर (डोईपट्टी) : -**

मोगल साम्राज्यात काही काळ प्रचलित असलेला इस्लामेत्तर प्रजाजनांवरील जो कर लावला जात असे तो जिजिया कर होय[१]. औरंगजेब बादशहाच्या काळात मोगल साम्राज्याचा सर्वात जास्त विस्तार झाला. त्यावर नियंत्रण ठेवने जड जाऊ लागले. दळणवळणाच्या साधनाचा अभाव व्यक्तिगत जिवनात औरंगजेब निष्कलंक असला तरी शासक व मुत्सद्दी म्हणून तो अपयशी ठरला. सम्राट अकबराने सुरू केलेले उत्कृष्ठ राजकीय धोरण, धार्मिक सहिष्णुता, उच्च पदावर योग्य व्यक्तिची निवड इ. गोष्टींचा औरंगजेबाने त्याग केला. त्याने धर्मांध नीतीचा अवलंब करून राज्य इस्लामी (दार-उल-इस्लाम) बनविण्याचे प्रयत्न केले. संपूर्ण देशच इस्लाममय बनविण्याचे त्याचे उद्दिष्ट होते. पण त्याचा हा प्रयोग त्याच्या आंगलट आला. या धोरणामुळे विविध स्तरातुन विरोध सुरू झाला. त्यात शिख, सतनामी, जाट, राजपूत, बुंदेले आणि मराठे ह्यांनी मुगलांशी संघर्ष सुरू केला. त्याने हिंदूवर पुन्हा जिजियाकर लावला. त्यामुळे हिंदू जनता व शासक संतप्त झाले[२].

औरंगजेब बादशहाच्या पूर्वी सम्राट अकबराने सर्व धर्मातील चांगले विचार त्याचबरोबर सम्राट गौतम बुध्द आणि चार्वाक हे सर्व श्रेष्ठ आहेत या सर्व विचारातून एक सार्वभौम परिपूर्ण धर्माची स्थापना करण्यासाठी दीन-ए-इलाही धर्म स्थापन केला. विविध धर्मातील सत्य एकत्रित करून अबुल फजलला लिपिबध्द करण्याचे सांगितले. त्यात आत्मा व ईश्वर शक्ती उत्कृष्ट व रहस्यमय एकीकरण, प्रेम, सदाचरण,

संयम, सहिष्णूता, उदार विचार, विवेकशील आणि बंधुत्वाचे भाव यासर्व बाबींचा विचार सम्राट अकबराने केला. परंतु औरंगजेब बादशहाने केला नाही[३].

छत्रपती शिवाजी महाराजांना सर्व धर्माबद्दल आदर होता. याचे उदाहरण म्हणून बाबा याकूत हे मुसलमान सत्पुरूष गुरूस्थानी होते. मदारी मेहतर ! हा तर राजांचा अतिशय विश्वासू सेवक. मदारीला जेवढा इस्लाम धर्म उमगला होता त्याच्या नखाऐवढाही औरंगजेबाला समजला नाही. हिंदूच्या कत्तली, बाटवाबाटवी, त्यांच्या मुलीबाळी जनानखाण्यात कोंडणे, हिंदुंची मंदिरे फोडणे, देवतांची विटंबना करणे, त्यांच्यावर जिजियाकर लावणे अशा क्रुर अत्याचाराला तो धर्म समजत असे. हिंदुंचा द्वेष करणे यालाच तो इस्लाम धर्म समजत असे[४].

सम्राट अकबराने जिजियाकर रद्द केला, परंतु औरंगजेबाने तो पुन्हा लागु केला. शिवाजी महाराज त्याविषयी औरंगजेबाला लिहिलेल्या पत्रात म्हणतात, 'अकबराने सर्व धर्मिया प्रती सहिष्णुता धोरण पत्कारले त्याला जगद्‌गुरू म्हणून संबोधण्यात येईल. तुमचा जर पवित्र ग्रंथ कुराणावर विश्वास असेल तर, त्यात ईश्वराचे वर्णन रब-उल-आलमीन सर्व लोकांचा ईश्वर असे आहे. तो केवळ रब-उल-मुसलमान म्हणजे मुसलमानांचाच ईश्वर नाही. मशिदीत अथवा मंदिरात त्याच ईश्वराची आराधना होते[५].

इस्लामी राज्यामध्ये राहण्यासाठी परवानगी मिळावी म्हणून बिगर मुसलमान किंवा अश्रध्दाळुंना जिजिया नावाचा कर देणे भाग असे. जिजिया म्हणजे (सबस्टिट्युट मनी) सरकारी अनुगृह मिळावा म्हणून द्यावी लागणारी किंमत हा कर प्रथम महमद पैगंबराने लावला. धर्माचे पालन न करणाऱ्यावर असे. जिजियाकर अशा प्रकारे गोळा केला जावा की, तो देणाऱ्याला मानहानीकारक आणि अपमानास्पद वाटावा. देणारा पायी चालत आला पाहिजे. तो उभा राहून दिला पाहिजे. घेणारा आसनस्थ असेल. स्त्रिया व चौदा वर्षाखालील मुले आणि गुलाम यांना कर माफी देण्यात आली होती. आंधळे, लुळे पांगळे आणि अर्धवट यांच्याजवळ संपत्ती असेल तेव्हाच हा कर द्यावयाचा होता. गरिब भिक्षुकांना कर माफ असे. श्रीमंत देवस्थानाशी संलग्न असे अशा धार्मिक देवस्थानाच्या प्रमुखाला हा कर द्यावा लागत असे. उत्पन्नाच्या प्रमाणानुसार या कराची आकारणी होत नसे. परंतु कर देणाऱ्याचे किमान पक्षी तीन वर्ग त्यांच्या उत्पन्नारूप पाडले जात. ते म्हणजे ज्याच्या मालमत्तेची किंमत २०० दिरहामच्यावर नाही अशा गरिबांचा वर्ग, २०० आणि १०,००० दिरहाम एवढी ज्यांच्या मालमत्तेची किंमत आहे असा मध्यम वर्ग आणि १०,००० वर मालमत्तेच्या वर किंमत आहे असा श्रीमंत वर्ग पेढीवाले, कपडा व्यापारी, जमीनदार, व्यापारी आणि डॉक्टर वर्ग यांचा समावेश होता. शिंपी, रंगारी, मोची आणि जोडे बनविणाऱ्या वगैरे कारागिरांची गणना गरिब वर्गात करण्यात येई. उत्पन्न व कुटुंबियांच्या पोषणार्थ लागणाऱ्या खर्चापेक्षा अधिक असेल त्यावेळी त्यांना जिजियाकर द्यावा लागे. भिकारी आणि दारिद्री हे सहाजिकच करमुक्त असत.

वरील तीन वर्गासाठी ठरविण्यात आलेले दर वर्षाला अनुक्रमे १२, २४ आणि ४८ दिरहाम किंवा ३ १/३, ६ १/३ आणि १३ १/३ रूपये असे होते. सहाजिकच गरिबावर पडणारा बोजा त्यांच्या कुलउत्पन्नाच्या कमीत कमी ६ टक्के होता. मध्यमवर्गावर पडणारा हा बोजा ६ १/४ टक्के इतका होता. श्रीमंतावर तो अगदीच कमी म्हणजे जेमतेम दरहजारी २ १/२ टक्क ऐवढा होता. आजच्या जगातील कर पध्दती संबंधी जे काही सर्वसामान्य नियम आहेत त्यांच्या दृष्टीकोनातून जिजियाकर पध्दती म्हणजे उघड उघड नियम भंग करणारी होती. कारण जिजियाकरामुळे समाजातील अगदी गरिब हिंदु वर्ग जो होता त्याची त्यामुळे भयानक पिळवणूक होत होती[६].

आपल्या धर्माच्या नीतिनियमानुसार आपल्याला वागता यावे, म्हणून औरंगजेबाने गरिब स्तरातील हिंदू प्रजेला त्यांच्या वार्षिक अन्न धान्यावर खर्च होणाऱ्या रक्कमेइतकी किंमत कराच्या रूपाने त्यांना द्यावी लागत होती. यासर्व बाबींचा विचार करून सम्राट अकबराने हा कर रद्द केला होता. परंतु औरंगजेबाने या धोरणाच्या विरूध्द धोरणाचा पुरस्कार केला. २ एप्रिल १६६९ या तारखेपासून साम्राज्याच्या सर्व भागातील काफर (अश्रध्दाळु) प्रजेवर जिजियाकर परत लावण्याची शाहीफर्माने काढण्यात आली. याचा अर्थ "इस्लामांचा प्रसार करणे आणि खऱ्या धर्माप्रमाने न वागणाऱ्यांच्या धर्म पध्दतीचे निर्मुलन करणे हा होता." दिल्ली आणि दिल्लीच्या आसपास राहणाऱ्यानी एकत्र येवून हा कर मागे घेण्यात यावा अशी केविलवाणी याचना केली. पण बादशहाने या विनंतीकडे हेतुपुरस्कर दुर्लक्ष केले. पुढील शुक्रवारी किल्ल्याच्या दरवाजापासून तो जामा मशिदीपर्यंतचा रस्ता दिनवान्या हिंदुंच्या समुदायाने आडवून टाकला. त्यांना तेथून हटवून जाण्यासाठी दिलेला इशारा त्यांनी मानला नाही. जवळ जवळ बादशहाला प्रार्थनासाठी एक तास वाट पाहावी लागली. अखेर आपला विरोध दाखविण्यासाठी जमलेल्या

जनता सागरात हत्ती सोडण्याचा हुकुम त्याने सोडला. अनेक लोक हत्तीच्या पायाखाली तुडविले गेले. बादशहाला जाण्यासाठी वाट करण्यात आली. यासंदर्भात छत्रपती शिवाजी महाराजांनी पत्र लिहुन त्यांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न केला, पण शिवाजीने केलेल्या आव्हानाला उपयोग उपड्या घड्यावर टाकलेल्या पाण्यासारखा झाला. कराच्या रूपाने खजिन्यात बरीच मोठी रक्कम जमा होई. गुजरात सुभा वार्षिक पाच लाख रूपये कर मिळत असे. जिजियाकर म्हणजे हिंदूंच्या दृष्टीकोनातून प्रत्येक नागरिकाकडून राजाला मिळणाऱ्या प्रत्येक उत्पन्नाचा जवळ जवळ १/३ भाग ऐवढा अधिक कर असे. आपण असे विधान केले तर त्यात फारशी चूक असण्याचे कारण नाही. मुसलमान नागरीक असने म्हणजे या जादा करापासून सूट असेच प्रमेय होते[७].

**निष्कर्ष :**

३) धर्मावर आधारित कर रचना होती.

४) हिंदुंना धर्म परिवर्तन करविण्याचा उद्देश होता.

५) जिजियाकर प्रचलित नियम भंग करणारा होता.

६) जिजियाकर इस्लामेत्तरावर होता.

**सारांश :**

औरंगजेबाच्या कारकिर्दीतच मोगल साम्राजाची विघटनाची बिजे रूजली गेली असे दिसून येते. त्यांच्यानंतर मोगल साम्राज्य फुटून अनेक प्रांतीक सत्ता आकाराला आल्या. बादशहा जिजिया कराची फेरलादणी करण्याचा उघड उघड उद्देश हिंदुवर अधिकाधिक दडपण आणून त्यांना धर्म परिवर्तन करण्यास भाग पाडणे आणि मुसलमानांच्या संख्येत भर घालणे हा होता. औरंगजेबाच्या समकालीन इतिहासकार मनुची याबाबत म्हणतो, "ज्या हिंदूना जिजियाकर देणे अशक्य होते. ते मुसलमान झाले'.' असे केल्याने जिजियाकर वसूल करणाऱ्याकडून होणाऱ्या अपमानातून त्यांची मुक्तता होत असे. औरंगजेबाला या गोष्टीचा अत्यानंद होई. मोगल सत्तेचा ऱ्हास होण्यासाठी जिजियाकर हे एक कारण होते. शेवटी औरंगजेबाने राजकीय पातळी ओलांडली आणि धार्मिक पातळी गाठली व तो धर्मांध बनला.

**संदर्भ सूची :**

१. देव प्रभाकर, इतिहास एक शास्त्र, कल्पना प्रकाशन, नांदेड, १ जानेवारी २००२, पृ.क्र. १२१

२. गोवर बी.एल., बेल्हेकर एन.के., आधुनिक भारताचा इतिहास, एस.चंद्र कंम्पनी, नई दिल्ल्ली, २०१३ पृ.क्र.१७

३. द्विवेदी रेखा, दुबे राजीव, सर्व धर्म-समभाव एक विश्लेषण, राष्ट्रीय सद्भाव प्रतिष्ठान, नई दिल्ली, २००४, पृ.क्र. २२

४. सातपुते मनोहर, सातपुते बाबुराव, शिवराय आणि शिवकालीन संदर्भ, ज्ञानेश्वरी प्रकाशन, डोंबिवली, २०१३, पृ.क्र. १३०

५. मार्डीकर मदन, मराठ्यांच्या इतिहास, विद्या बुक्स, औरंगाबाद, जून २००८, पृ.क्र. ४४४

६. कुंटे भ.ग. (भाषांतर), औरंगजेबाचा इतिहास, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई १९७८, पृ.क्र. ३५२.

७. कित्ता, पृ.क्र. ३५३